# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** कोपरगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0047 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/02/2026 00:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 02/02/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/02/2026
**Time From (वेळेपासून):** 14:42 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/02/2026 **Time (वेळ):** 00:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2026 00:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय,कोपरगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** छाया कडु देवरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,कोपरगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,कोपरगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788215086

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अंजना पंडीत पवार | | | 1. व्दारावती रेसिडेन्सी,कोपरगाव, कोपरगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद दि.03/02/2026

मी छाया कडु देवरे, वय 39 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8788215086.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.01/02/2026 रोजी तक्रारदार श्री. सचिन दिलीप लाटे यांनी आमचेषी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व ते लोकसेवक यांस दि. 02/02/2026 रोजी कोपरगाव येथे भेटणार असलेबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही मा.तालुका कृशी अधिकारी, अहिल्यानगर यांना संपर्क करून पंच उपलब्ध करून घेवुन त्यांना दि.02/02/2026 रोजी सकाळी 08/00 वा ला.प्र.वि कार्यालय येथे हजर राहणेबाबत कळविले. आमचे सुचनेवरून दि. 02/02/2026 रोजी आमचे सुचनेप्रमाणे तालुका कृशी अधिकारी, अहिल्यानगर विभागाचे पंच साक्षीदार यांना आमचे कार्यालयीन कक्षामध्ये बोलाविले व त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकाॅ गायकवाड, पोकाॅ सुदर्रक, पोकाॅ सुपेकर यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाषी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिषी षासकीय वाहन क्र. .एमएच-16 सी.व्ही 0919 ने 08.30 वा. निघुन 11/30 वा. चे दरम्यान कोपरगाव येथील सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांच्याकडील मोटारसायकल क्र. एम .एच.17 सी.कयु. 4708 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. सचिन दिलीप लाटे वय- 32 वर्षे, धंदा- षेती, रा. समनापुर, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, '' मी वरील ठिकाणी माझी आई अलका दिलीप लाटे, पत्नी वैषाली, व दोन मुले असे एकत्रित राहण्यास आहे. माझ्या जन्मानंतर अंदाजे सन 1993 पासुन माझे आई व वडिल हे कोैटुंबिक वादामुळे एकमेकांपासुन वेगळे राहण्यास असुन तेव्हापासुन मी माझ्या आईकडे राहण्यास आहे.

सन 1999 मध्ये माझी आईने माझ्या वडिलांच्या विरूद्ध मा.न्यायालय, कोपरगाव येथे आमच्या पुढिल उदरनिर्वासाठी माझ्या वडिलोपार्जित षेतजमिनी मधील माझा हिस्सा मिळणेकरीता अर्ज दाखल केला होता.(संदर्भः- रे.मु.नं. 152/1999 अन्वये) मा.न्यायालयानेे दि. 08/01/2021 रोजी मौ.जे सुरेगाव ता.कोपरगाव, येथील गट नंबर 103 या मिळकतीबाबतचा हुकुमनामा रे.मु.नं. 152/1999 नुसार नमुद मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देणे कामी मा.तहसिलदार, कोपरगाव यांना आदेषित केले आहे.

मा.न्यायालयाच्या आदेषाप्रमाणे माझ्या व माझ्या आईचे नावे सदर षेतजमीनीच्या सातबाÚया उताÚयावर नोंद होवुन षेतजमीनीचा ताबा मिळणे कामी मी तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे वारंवार चकरा मारत होतो. दि. 28/01/2026 रोजी मी नेहमी प्रमाणे तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे जावुन श्रीमती अंजना पवार, महसुल सहायक यांच्याकडे चैकषी केली असता त्यांनी मला सांगितले की, मला तुम्ही सात हजार रूपये दया मी तुम्हाला न्यायालयाने दिलेल्या आदेषाप्रमाणेे तुमच्या षेतजमीनीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेष मा. तहसिलदार, कोपरगाव यांच्याकडुन मिळवुन देते. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्रीमती अंजना पवार, महसुल सहायक हे माझे काम करून देणेसाठी माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.



CS CamScanner

आज रोजी मी माझ्या कामासंदर्भाने श्रीमती अंजना पवार यांची भेट घेणार आहे सदर भेटीदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. श्रीमती अंजना पवार व माझ्यात कोणताही भांडणतंटा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीच्या पैषातुन हजर करेल.'' अषी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. लाटे यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक श्रीमती पवार यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. सचिन लाटे व दोन्ही पंचांना माहिती समजावुन संागितली. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. सचिन लाटे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. सचिन लाटे असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकाॅर्ड केले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक पवार हया कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक पवार मॅडम हया तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार यांच्या ताब्यात दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार लाटे यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेवक श्रीमती अंजना पवार यांची भेट घेण्याकरीता कोपरगाव तहसिल कार्यालय येथे 12/28 वाजता रवाना केले. त्यानंतर 13/14 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक श्रीमती अंजना पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होवुन तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक अंजना पवार यांच्यामध्ये त्यांच्या कामासंदर्भाने चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार लोकसेवक अंजना पवार यांना म्हणाले कधी होईल आपल आाॅर्डरच त्यावेळी लोकसेवक अंजना पवार म्हणाल्या आम्ही करून घेवु तुम्ही फक्त हे काय हे, त्यावर तक्रारदार म्हणाले ते दहा म्हणताय तुम्ही त्या दिवषी सात म्हणाले त्यावर लोकसेवक अंजना पवार म्हणाल्या, हो तेवढे चं! त्यावर तक्रारदार म्हणाले सात मध्ये होईल ना त्यावर लोकसेवक अंजना पवार यांनी मुक संमती दिली, अषी हकिकत सांगितली.

तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकाॅर्ड झालेल्या संभाशणा वरून लोकसेवक अंजना पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे मा.न्यायालयाच्या आदेषाप्रमाणेे नमुद मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेष मा.तहसिलदार, कोपरगाव यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी 7,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निश्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक अंजना पवार यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्याकडील 7000/- रूपये हजर केले. त्यांनी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. तक्रारदार व पंचाना अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकाॅ सुपेकर यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत सर्वांना सुचना समजावुन सांगितल्या.

त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांना योग्य त्या सुचना समजावुन सांगुन लाचेच्या नोटा व व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक श्रीमती अंजना पवार यांची भेट घेण्याकरीता तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे 14/42 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले व तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे सापळा लावुन थांबले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इषारा 15/30 वाजता केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन लाच रक्कम स्विकारणाÚया महिलेस ताब्यात घेतले. आम्ही सदर महिलेस तिचेे नाव विचारले असता तिने तिचे नाव श्रीमती अंजना पंडीत पवार वय- 36 वर्शे, महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर रा.हल्ली घर नं. 203, व्दारावती रेसिडेन्सी, कोपरगाव,जि.अहिल्यानगर मुळ रा. मु.पो. टेंभे गावठाण, ता.साक्ररी, जि.धुळे असे सांगितले. त्यानंतर आम्ही सदर घटना ठिकाणाचे फोटोग्राफ घेतले व पंचनाम्याचे पुढील कामकाज श्री.साई पोलीस विश्रामगृह षिर्डी येथे केले.

तरी दिनांक 02/02/2026 रोजी 12/28 ते 13/14 वाजेच्या दरम्यान कोपरगाव तहसिल कार्यालय येथे



CS CamScanner

लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक अंजना पंडीत पवार, महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांच्याकडे मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नमुद मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेष मा.तहसिलदार, कोपरगाव यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी 7,000/- रुपये लाचेची मागणी केली व यषस्वी सापळा कारवाई 14/42 वा ते 15/30 वा चे दरम्यान लोकसेवक श्रीमती अंजना पवार यांनी तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे 7,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारून स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याच्या हेतुने गुन्हेगारी गैरवर्तन केल्याने श्रीमती. अंजना पंडीत पवार वय- 36 वर्षे, महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर रा.हल्ली घर नं. 203, व्दारावती रेसिडेन्सी, कोपरगाव, जि.अहिल्यानगर, मुळ रा. मु.पो. टेंभे गावठाण, ता.साक्री, जि.धुळे यांचे विरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ramkrishna Mahadu Kumbhar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबरे देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
कोपरगांव शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Ramkrishna Mahadu
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**